शनिवार, दि. २० डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११६ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## अंतिम मतदार यादीत बदलास विरोध

### निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे लेखी अर्ज

**जालना । प्रतिनिधी -** जालना महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील मतदार यादीत कोणताही फेरबदल करण्यात येऊ नये, अशी ठाम मागणी खिस्ती कॅम्प येथील रहिवासी संजू प्रभाकर पाखरे, माजी नगरसेवक विणा सामलेट व ईतरांनी केली असून याबाबत त्यांनी मा. निवडणूक निर्णय अधिकारी, जालना महानगरपालिका यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज सादर केला आहे.

सदर तक्रार अर्जात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनामार्फत जालना महानगरपालिकेची निवडणूक प्रक्रिया सध्या सुरू असून संपूर्ण शहरात आचारसंहिता लागू आहे. अशा परिस्थितीत मतदार यादीत कोणताही फेरफार करणे हे नियमबाह्य ठरते.



अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार सर्व प्रभागांची प्रारूप मतदार यादी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १६ डिसेंबर २०२५ रोजी सर्व हरकती व चौकशी पूर्ण करून जालना शहरातील सर्व प्रभागांची अंतिम मतदार यादी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहे. ही अंतिम मतदार यादी संबंधित बी.एल.ओ. (Booth Level Officer) व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्फत घोषित करण्यात आली असून, यादीवर आक्षेप नोंदविण्याची मुदत देखील संपलेली आहे. त्यामुळे सध्या प्रभाग क्रमांक ३ व ४ मधील मतदार यादी अचूक व पान २ वर

## विद्यार्थ्यांनी विज्ञानाची कास धरावी - घनश्यामदास गोयल

### जिल्हा परिषद मुलांच्या प्रशालेत टीव्ही संच भेट

**जालना । प्रतिनिधी -** विद्यार्थीदशेत अभ्यासाकडे मनःपूर्वक लक्ष दिल्यास त्यांचे भविष्य उज्वल ठरते. याकरिता विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी दिलेल्या सूचनांकडे व अभ्यासाकडे गांभीर्यपूर्वक बघायला हवे तसेच विज्ञानाची कास धरावी तरच महापुरुषांच्या स्वप्नातील भारत महासत्ता होईल, असे उद्योजक प्रतिपादन घनश्यामदास गोयल यांनी येथे केले.

श्री. गोयल यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून येथील जिल्हा परिषद मुलांची प्रशालेत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्याकरिता टीव्ही संच भेट देण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी हिन्दू महासभा प्रदेश संघठन मंत्री धनसिंह सुर्यवंशी यांच्यासह ओम हॉस्पिटलचे संचालक डॉ. रितेश अग्रवाल, अँड. ईश्वर बिल्होरे, मुख्यध्यापिका पान २ वर



## समाजवादी पक्षाची स्वबळाची तयारी

### इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधण्याचे पक्षाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** शहर महागनर पालिका निवडणुक २०२५ साठी समाजवादी पक्षाने स्वबळाची तयारी सुरु केली असून महानगर पालिकेतील सर्व प्रभागांमधील इच्छुक उमेदवारांना संपर्क साधण्याचे आवाहन पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.

समाजवादी पक्षाचे अखिलेश यादव, अबु असिम आझमी यांच्या मार्गदर्शन व सुचनेनुसार जालना जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर व जालना महानगर अध्यक्ष दीपक शेळके यांनी शुक्रवार (दि १९) रोजी समाजवादी पक्ष जालना पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या झालेल्या बैठकीत स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

जिल्हाध्यक्ष शेख नबी सिपोराकर यांनी सांगितले की, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी सोबत समाजवादी पक्ष होता. मात्र, महानगर पालिकाच्या निवडणुका घोषित झाल्यानंतर महाविकास आघाडीतील काँग्रेस, शिवसेना (उद्धव ठाकरे) तसेच राष्ट्रवादी (शरद पवार) या घटक पक्षातील जालन्यातील कोणत्याही नेत्यांनी आतापर्यंत संपर्क साधला नाही. लोकसभा आणि विधानसभेसाठी यांनी समाजवादी पक्षाची मदत लागते आणि कार्यत्यांच्या निवडणुका आल्या की हे पक्ष स्वबळाची भाषा करतात. समाजवादी पक्षही जालना महानगर पालिकेत स्वबळावर लढणार आहे. वेळ कमी असला तरी शक्य तितक्या ठिकाणी समाजवादी पक्षाचे उमेदवारी देण्याचा निश्चय आजच्या बैठकीत झाला आहे. त्यामुळे नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी रेल्वे स्टेशन- नुतनवसाहत रोडवरील डॉ. चाटे हॉस्पीटलच्या जवळ असलेल्या कृष्णा प्लाझा येथील समाजवादी पक्षाच्या कार्यालयात सकाळी ११ ते ६ वाजेपर्यंत येत्या २२ डिसेंबरपर्यंत इच्छुक अर्ज भरुन द्यावे.

सर्वसाधारण उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारी शुल्क २००० रुपये असून ओबीसी, एस.सी, एस.टी, महिला कॅटेगिरीसाठी १००० रुपये शुल्क भरावे लागणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी येतांना इलेक्शन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट फोटो सोबत आणणे गरजेचे आहे. अधिक माहितीसाठी ९४२२५६०६६८, ८३९००४८८८६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे. या बैठकीला समाजवादी पक्षाचे जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी, जालना महानगर कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.



# संपादकीय पान

## कर्मयोगी

महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज पुण्यतिथी. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडाधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी, परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ठेवता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अरिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर-गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साधे सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची ६९ वि पुण्यतिथी, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

### पान १ वरुन

#### अंतिम मतदार ...

नियमबद्ध असल्याचा दावा अर्जदारांनी केला आहे.

तक्रार अर्जात पुढे नमूद करण्यात आले आहे की, आचारसंहिता लागू असताना व अंतिम मतदार यादी जाहीर झाल्यानंतर कोणताही बदल केल्यास तो निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन ठरेल. यामुळे निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. यामुळे प्रभाग क्रमांक ३ व ४ तसेच इतर कोणत्याही प्रभागातील मतदार यादीत कोणताही फेरबदल करू नये, अशी स्पष्ट मागणी या तक्रार अर्जामधून करण्यात आली आहे.

दरम्यान, या तक्रारीमुळे निवडणूक प्रशासन काय भूमिका घेते याकडे राजकीय वर्तुळासह सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे. मतदार यादीत फेरफार झाल्यास निवडणूक प्रक्रियेत वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नियमांनुसारच निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

#### विद्यार्थ्यांनी विज्ञानाची ...

डॉ. एस. यु. मेहेत्रे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक यशवंत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

या कार्यक्रमाला एस. एस. वाघमारे, श्रीमती फरहिन तबस्सुम, प्रा. पदवीधर डी. ए.सय्यद, सहशिक्षिका श्रीमती आर. आर. तोटे, नजमा बेगम ख्वाजा अहमद, प्रभा जाधव, श्रीमती संत्रे, एल.के. शेख, के. डी. गव्हाणे, आर. आर. मुंगीपैठणकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हिन्दू महासभेचे पदाधिकारी प्रसाद क्षिरसागर, शिवप्रसाद राठी, प्रकाश हजारे, कार्तिक मदन, डॉ. आशिष गोयल, नंदु बिल्होरे, रोहित नलावडे यांनी परिश्रम घेतले

# निष्क्रिय इच्छामरणाचा पेच: सर्वोच्च न्यायालयापुढील सर्वात कठीण निर्णयाची प्रतीक्षा

## धर्मसंकट: जेव्हा न्यायदेवतेलाही अश्रू अनावर होतात

**नवी दिल्ली -** गेली १२ वर्षे वनस्पती अवस्थेत असलेल्या ३२ वर्षीय तरुणाच्या निष्क्रिय इच्छामरणाच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. इमारतीवरून पडून अपघात झाल्यापासून हा तरुण अंथरुणाला खिळून आहे. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या अहवालानंतर, न्यायालयाने या प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यासाठी तरुणाच्या पालकांशी थेट संवाद साधण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश एस. धनावत यांनी, हा न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील सर्वात कठीण आणि भावनिक निर्णयांपैकी एक असेल, असे मत व्यक्त केले आहे.

**न्यायालयापुढील करुण कहाणी**

न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. तरुणाचे वडील, हरीश राणा, यांनी आपल्या मुलाला सर्व जीवन-समर्थन प्रणालीतून मुक्त करण्याची परवानगी मागणारी याचिका दाखल केली आहे. 'कॉमन कॉज प्रकरणातील २०१८ च्या घटनात्मक खंडपीठाच्या निकालातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार, निष्क्रिय इच्छामरणाला परवानगी देण्यापूर्वी प्राथमिक आणि दुय्यम वैद्यकीय मंडळांचे मत घेणे बंधनकारक आहे.

या प्रकरणी, प्राथमिक वैद्यकीय मंडळाने आधीच आपला अहवाल सादर केला होता, ज्यात तरुणाच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता नगण्य असल्याचे म्हटले होते. तो श्वासोच्छवासासाठी ट्रेकिओस्टोमी ट्यूबवर आणि पोषणासाठी गॅस्ट्रोस्टोमीवर अवलंबून आहे. त्याच्या शरीरावर अंथरुणामुळे झालेल्या मोठ्या जखमा झाल्याचेही छायाचित्रांवरून स्पष्ट झाले होते.

यानंतर, न्यायालयाने एम्सला दुय्यम वैद्यकीय मंडळ स्थापन करून तपासणीचे आदेश दिले. अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी आज न्यायालयात एम्सचा अहवाल सादर केला. अहवाल पाहिल्यानंतर न्यायमूर्ती पारडीवाला यांनी टिप्पणी केली की, हा एक दुःखद अहवाल आहे आणि त्या मुलाला अशा स्थितीत कायम ठेवता येणार नाही.

**अंतिम निर्णयापूर्वी पालकांशी संवाद**

न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या वकील रश्मी नंदकुमार आणि एएसजी भाटी यांना अहवालाचा सखोल अभ्यास करून अंतिम सुनावणीत न्यायालयाला सहकार्य करण्याचे निर्देश दिले. एएसजी भाटी यांनी कोणताही आदेश देण्यापूर्वी कुटुंबाशी सल्लामसलत करणे आवश्यक असल्याचे सुचवले, ज्याला न्यायालयाने सहमती दर्शवली. न्यायालयाने म्हटले की, आम्ही अशा टप्प्यावर पोहोचलो आहोत जिथे आम्हाला अंतिम निर्णय घ्यावा लागेल... अशा महत्त्वाच्या प्रकरणात ऑनलाइन संवाद योग्य ठरणार नाही. त्यामुळे, न्यायालयाने तरुणाच्या पालकांना १३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता समिती कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

**न्यायालयाचा आदेश:**

आमच्या ११ डिसेंबरच्या आदेशानुसार, एम्स, नवी दिल्ली द्वारे एक दुय्यम वैद्यकीय मंडळ स्थापन करण्यात आले होते. डॉक्टरांच्या पथकाने रुग्णाची वैद्यकीय तपासणी केली आणि १६ डिसेंबर २०२५ रोजी अहवाल सादर केला आहे. आम्ही निबंधकांना या अहवालाची एक प्रत ड. रश्मी नंदकुमार आणि एएसजी ऐश्वर्या भाटी यांना देण्याचे निर्देश देत आहोत. त्यांनी अहवालाचा अभ्यास करून आम्हाला सहकार्य करावे. आम्ही त्यांना हरीश राणा यांच्या पालकांशी आणि कुटुंबातील इतर सदस्यांशी संयुक्तपणे बोलून त्या संदर्भात अहवाल देण्याची विनंती करतो. आम्ही स्वतः हरीश राणा यांच्या पालकांशी बोलू इच्छितो. या उद्देशासाठी, आम्ही त्यांना १३ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजता समिती कक्षात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची विनंती करतो.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

यापूर्वी २०२४ मध्ये वडिलांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती, परंतु तेव्हा न्यायालयाने निष्क्रिय इच्छामरणाची परवानगी नाकारली होती. तथापि, न्यायालयाच्या सूचनेनंतर उत्तर प्रदेश सरकारने तरुणाच्या वैद्यकीय उपचाराची जबाबदारी स्वीकारली होती. मात्र, मुलाची प्रकृती अधिकच खालावल्याने आणि तो कोणत्याही उपचारांना प्रतिसाद देत नसल्याने वडिलांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली.

**धर्मसंकट आणि महाभारतातील संदर्भ**

ही परिस्थिती एका मराठी म्हणीची आठवण करून देते: आईची माया आणि यमाचा न्याय, दोन्ही एकत्र येणे कठीण. येथे न्यायालय एकाच वेळी आईच्या मायेने आणि यमाच्या न्यायाने विचार करत आहे.

महाभारतातील एक प्रसंग या परिस्थितीशी साधर्म्य दर्शवतो. जेव्हा भीष्म पितामह बाणांच्या शय्येवर (शरपंजरी) उत्तरायणाची वाट पाहत पडून होते, तेव्हा त्यांना इच्छामरणाचे वरदान होते. ते असह्य वेदना सहन करत होते, परंतु योग्य वेळेची प्रतीक्षा करत होते. त्यांच्यासमोरही जीवन आणि मृत्यूचा प्रश्न होता, परंतु त्यांचा निर्णय स्वतःच्या इच्छेवर अवलंबून होता. याउलट, हरीश राणा यांच्या प्रकरणात, निर्णय घेण्याची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयावर आहे, जी त्यांच्यासाठी एका धर्मसंकटापेक्षा कमी नाही. भीष्मांप्रमाणेच हा तरुणही वेदना सहन करत आहे, पण त्याच्या वेदनांचा अंत कधी आणि कसा करायचा, हा निर्णय न्यायदेवतेला घ्यायचा आहे.

# मानवी जीवनाचा काय भरवसा ?

हल्लीचा माणूस फार गर्विष्ठ व अहंकारी बनला आहे. अहंकाराच्या नशेत तो स्वतःला उच्चभ्रू आणि दुसऱ्यांना कमी दर्जाचा मानून तुच्छ लेखत आहे आणि अहंकाराच्या नशेत वावरत आहे. स्वतःला श्रेष्ठ व इतरांना दुय्यम समजून मोठेपणाचा तोरा मिरवत आहे. अहंकाराच्या नशेत तो नातीगोती, भाऊ बहीण, मित्रपरिवार आणि समाज बांधव यांना आपल्यापेक्षा कमी समजून व यांच्यापासून दूर राहून आपल्याच तोऱ्यात जीवन जगत आहे. सांगायची बाब म्हणजे, आजकाल माणसाकडे थोडाफार पैसा आला किंवा माणूस छोट्या मोठ्या पदावर नोकरीला लागला, की लगेच त्याच्यातील अहंकार उफाळून येतो आणि तो दुसऱ्यांना कमी लेखतो आणि त्यांच्या विचारांना पायदळी तुडवून आपण किती मोठे आहोत असे लोकांना दाखवत फिरतो. काही जणांना स्वतःच्या श्रीमंतीचा खूप गर्व असतो. काही जणांना स्वतःच्या ज्ञानाचा व बुद्धीचा प्रचंड गर्व असतो. काही जणांना स्वतःच्या नोकरीचा फार घमंड असतो. काही जणांना भरपूर शेती व संपत्ती असल्याचा माज असतो. तर काही जणांना स्वतःच्या कलागुणांचा खूप गर्व आणि अभिमान असतो. असे काही गर्विष्ठ माणसे आपल्याला पदोपदी पाहायला मिळतात. ही गर्विष्ठ माणसे स्वतःहून कोणालाच बोलत नाहीत. त्यांना वाटते की, दुसऱ्यांनी मला स्वतःहून बोलावे, माझ्या ज्ञानाचे व कौशल्याचे कौतुक करावे. त्यांनी केवळ मलाच मानसन्मान द्यावा, केवळ माझ्याच मागे फिरावे पण अशा गर्विष्ठ माणसांना कोणताच माणूस बोलायला तयार नसतो. ते नेहमी एकलकोंडे जीवन जगत असतात. एखाद्याकडे भरपूर पैसा असेल तर तो माणूस स्वतःला फार मोठा माणूस समजतो. आणि आपल्याच माणसांना बोलायचे टाळतो. गोरगरिबांना, कष्टकऱ्यांना, कामगारांना, वंचितांना व अडचणीत सापडलेल्या गरजू लोकांना माणुसकीच्या नात्याने आर्थिक मदत करायची असते, हे ते पूर्णपणे विसरून जातात. अशा गर्विष्ठ लोकांना आपल्यापेक्षा धनाने वा ज्ञानाने मोठे असणाऱ्या लोकांचा मोठेपणा बघवत नाही. गर्विष्ठ माणसाला गर्विष्ठ माणसे आवडत नाहीत. गर्विष्ठ माणसाची सगळ्यात मोठी चूक म्हणजे, त्यांना इतरांना स्वतःहून बोलणे नको वाटते. लोकांनी मला स्वतःहून बोलावे, माझ्या कार्याचा गौरव करावा, माझ्या ज्ञानाचे कौतुक करावे आणि मला चारचौघात मान सन्मान द्यावा, असे गर्विष्ठ लोकांना मनोमन वाटत असते. अशा गर्विष्ठ लोकांना मी सांगू शकतो की, मित्रांनो तुमच्याकडे भरपूर संपत्ती आहे. आलिशान गाडी व आलिशान बंगला आहे. तुम्ही मोठ्या पदावर उच्च पदस्थ अधिकारी आहात. तुम्ही खूप ज्ञानी व बुद्धिवान आहात. उच्चशिक्षित व अष्टपैलू व्यक्तिमत्व आहात. परंतु तुम्हाला जर आपल्या माणसांसोबत, आई-वडिलांसोबत, बहिण भावासोबत, मित्रांसोबत, नातेवाईकांसोबत आणि समाज बांधवांसोबत कसे वागावे व कसे बोलावे? हे जर कळत नसेल तर तुम्हाला माणूस तरी म्हणावे कसे? माणुसकीच्या नात्याने चार शब्द बोलणे व त्यांना आपल्याशी जवळ करून मैत्रीचे संबंध जोडणे जमत नसेल तर तुमच्या त्या ज्ञानाला, तुमच्या त्या धनाला आणि तुमच्या त्या गाडी व बंगल्याला काय चुलीत घालायचे आहे का? मित्रहो, मानवी जीवन क्षणभंगुर आहे. मानवी जीवनाचा काय भरवसा? आज आहे तर उद्या नाही, मानवी जीवन पाण्यावरचा बुडबुडा असल्यामुळे तो बुडबुडा कधी फुटेल आणि आपले जीवन कधी उठेल, याचा काही नेम नसतो. म्हणून मित्रहो सगळ्यांशी प्रेमाने व आपुलकीने वागून स्नेहभाव जपावा. प्रत्येकाला आदराने बोलून व त्यांच्या अडीअडचणीत धावून त्यांना आर्थिक मदत करणे, हे मानवी जीवनाचे परम कर्तव्य आहे. जो माणूस गर्विष्ठपणे वागतो, अहंकारी जीवन जगतो, त्या माणसाच्या जीवन जगण्याला काहीच अर्थ उरत नाही. भलेही तुम्ही खूप महान व्यक्ती आहात, तुमच्याकडे जीवनभर न संपणारी संपत्ती आहे, तुम्ही मोठ्या पदावर क्लास वन अधिकारी आहात, पण तुम्ही जर गर्विष्ठ असाल तर तुमच्या त्या नोकरीला व मोठेपणाला कवडीचीही किंमत राहत नाही. माणूस कितीही गरीब असू द्या, भलेही त्याच्याकडे मुबलक पैसा नसू द्या, तो शेतात काबाडकष्ट करून घर प्रपंच चालवणारा असू द्या, नाहीतर एखाद्याच्या शेतात सालगडी म्हणून काम करणारा असू द्या, पण तो जर गर्विष्ठ नसेल आणि त्याच्यात माणुसकी ठासून भरलेली असेल, तर तो माणूस या पृथ्वीतलावरचा सर्वात नंबर एकचा भारी माणूस असेल. ज्या माणसात माणुसकी ठासून भरलेली असते, तो माणूस कधीच गर्विष्ठपणाचा व अहंकाराचा तोरा मिरवत नाही. गर्विष्ठ माणसाला समाजात कसलीच किंमत व मान सन्मान नसतो. ज्या माणसाच्या मागे कायम माणसांचा थवा राहतो, तो माणूस खरा माणूस म्हणून ओळखला जातो. मित्रांनो मानवी जीवनाचा काय भरवसा? मेल्यानंतर आपल्याला काहीच घेऊन जायचे नाही. घर, शेती, बंगला, गाडी व पैसा हे सर्व आपल्याला इथेच सोडून रिकाम्या हाताने जायचे आहे. मग एवढा गर्व व अहंकार कशासाठी करायचा? जाताना आपल्याला काहीच घेऊन जायचे नाही पण मेल्यानंतर आपल्याला जर लोकांच्या मनात कायमचे घर करून बसायचे असेल, तर आपल्याला सर्वप्रथम आपल्यात असलेला अहंकार व गर्व बाजूला काढून माणुसकीने व प्रेमाने सर्वांशी मोकळ्या मनाने बोलून लोकांची मने जिंकण हे माणुसकीचे वर्तन असते. माणसाचे मोठेपण पैशाने, धनाने, संपत्तीने, गाडी व बंगल्याने न ठरता तो माणूस मेल्यावर त्याच्या अंत्यविधीला किती माणसे गोळा होतात? आणि किती माणसांच्या डोळ्यातून अश्रू वाहतात, यावरून त्याचे मोठेपण सिद्ध होते. मित्रांनो या जगात कायमचे राहायला कोणीच आले नाही. जिवंतपणीच असे कार्य करा की मेल्यानंतरही लोकांनी आपल्या नावाचा उदो उदो केला पाहिजे. जसे की, महान विचारवंत तथागत गौतम बुद्ध, संत तुकाराम महाराज, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, भारतीय घटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे या महामानवांनी आयुष्यात कोणताच गर्व न करता कायम समाजकार्य करत राहिले आणि लोकांच्या मनात मानाचे अढळ स्थान निर्माण केले. आज त्यांना मरून कित्येक वर्षे होत आहेत तरीसुद्धा ते लोकांच्या मनामध्ये अजूनही जिवंत आहेत. म्हणून मित्रांनो मानवी जीवनाचा भरवसा म्हणजे पाण्यावरचा बुडबुडा आहे, तो कधी फुटेल आणि माणूस जीवनातून कधी उठेल याचा काही नेम नसतो, म्हणून माणसांनो, जीवनात माणसे कमवायला शिका. गर्वाचे घर कधीही खालीच राहते. त्यासाठी भांडण तंटे सोडून प्रत्येकाशी मित्रत्वाने व आपुलकीने राहिले तर खरंच आपण सुद्धा चिरकाळ लोकांच्या मनात कायमचे घर करून राहाल, त्यासाठी गरज आहे ती, गर्वाला बाजूला काढून प्रत्येकाशी गोड बोलून मैत्रीचे संबंध अधिक घट्ट करण्याची. मानवी जीवनाचा काही भरवसा नाही हे कायम ध्यानात ठेवण्याची.

**-बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# महानगरपालिकेला दिरंगाईमुळे धोका वाढला; सर्वोच्च न्यायालयाचा दिल्लीतील निर्णय दिशादर्शक

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील बांधकाम व्यावसायिक आणि मालमत्ताधारकांसाठी धोक्याची घंटा वाजवणारी एक मोठी बातमी समोर येत आहे. एकीकडे जालना महानगरपालिका शहरातील तब्बल अंदाजे ६२३ धोकादायक इमारतींना केवळ नोटीस देऊन कारवाईकडे पाठ फिरवत आहे, तर दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयाने अशाच एका प्रकरणात दिल्ली महानगरपालिकेला तब्बल १० लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या पार्श्वभूमीवर, जालना महानगरपालिकेचा सुस्त कारभार आणि नागरिकांच्या जीविताशी होणारा खेळ यावर ड. महेश एस. धनावत यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

ॲड. धनावत यांनी म्हटले आहे की, जालना महानगरपालिकेचा कारभार अत्यंत संथ गतीने सुरू आहे. शहरात अनेक जुन्या आणि धोकादायक इमारती आहेत. महानगरपालिका दरवर्षी पावसाळ्यापूर्वी अशा इमारतींना नोटीस बजावते, परंतु त्यानंतर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. विशेषतः, जालना शहराचे ऐतिहासिक वैभव असलेला 'पाणी वेस' दरवाजा अत्यंत जीर्ण अवस्थेत असून तो कधीही कोसळू शकतो. याबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालयात तक्रार करूनही आणि त्या कार्यालयाने महानगरपालिकेला नोटीस देऊनही अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

**सर्वोच्च न्यायालयाचा दणका:**

दिल्लीतील एका प्रकरणात, ८५ वर्षे जुन्या जीर्ण घराच्या पुनर्बांधणीसाठी तब्बल १५ वर्षे परवानगी नाकारून त्रास दिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने दक्षिण दिल्ली महानगरपालिकेला (आता दिल्ली महानगरपालिका) पीडित कुटुंबाला १० लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. साऊथ दिल्ली म्युनिसिपल कॉर्पोरेशन विरुद्ध भारत भूषण जैन (मृत) २०२५ लाइव्हलॉ (सर्वोच्च न्यायालय) ११२१ या खटल्यात न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने महानगरपालिकेच्या भूमिकेवर तीव्र ताशेरे ओढले. नागरिकांना धोकादायक घरात राहण्यास भाग पाडणे आणि पुनर्बांधणीसाठी परवानगी नाकारणे, हे केवळ छळवणूक आहे, असे मत न्यायालयाने नोंदवले. न्यायालयाने केवळ नुकसान भरपाईच नव्हे, तर चार आठवड्यांत रहिवासी आराखड्यास मंजुरी देण्याचेही निर्देश दिले.

**जालन्यातील परिस्थिती:**

जालन्यातील परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. महापालिकेच्या रेकॉर्डनुसार शहरात अंदाजे ६२३ धोकादायक इमारती आहेत. या इमारतींमुळे कोणतीही मोठी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, हा प्रश्न अनुत्तरित आहे. महानगरपालिकेच्या मते, धोकादायक इमारत पाडण्याची जबाबदारी मालकाची आहे आणि ही प्रक्रिया खर्चिक असल्याने पालिका पुढाकार घेत नाही. मात्र, नागरिकांच्या जीविताचे रक्षण करणे हे प्रशासनाचे प्रथम कर्तव्य आहे, याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहे.

**नव्या आयुक्तांकडून अपेक्षा:**

भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली पूर्वीचे आयुक्त संतोष खांडेकर यांना अटक झाल्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी महानगरपालिका आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे शहरातील विकासकामांना गती मिळेल आणि प्रलंबित प्रश्नांवर तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ड. धनावत यांनी आशा व्यक्त केली की, नव्या आयुक्त तथा जिल्हाधिकारी मित्तल मॅडम या प्रकरणात जातीने लक्ष घालून धोकादायक इमारती आणि ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी तातडीने पावले उचलतील. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा बोध घेऊन जालना महानगरपालिकेने आपला कारभार सुधारावा, अन्यथा भविष्यात त्यांनाही अशाच कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल.

### जालना शहर महानगरपालिका निवडणूक

# महायुतीच्या निर्णयासाठी शिवसैनिक व इच्छुक उमेदवारांशी संवाद

**जालना । प्रतिनिधी -** शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा निर्णय घेण्यासाठी शिवसैनिक व इच्छुक उमेदवारांसोबत म हत्त्वपूर्ण संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक भाग्यनगर जालना येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.



या बैठकीस भास्कररावजी आंबेकर, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, आत्मानंद गणेश शेठ राऊत, , फिरोजलाला तांबोळी तसेच एडवोकेट भास्कर मगरे आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

बैठकीदरम्यान आगामी महानगरपालिका निवडणुकीसंदर्भात महायुतीची भूमिका, उमेदवार निवड प्रक्रिया, संघटनात्मक मजबुती तसेच स्थानिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शिवसैनिक व इच्छुक उम ेदवारांनी आपापली मते मांडत पक्ष संघटनेच्या मजबुतीसाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

सदरील बैठकीमध्ये जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव जी आंबेकर युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे आत्मा शहरप्रम ुख विष्णू पाच फुले गणेश शेठ राऊत आदी मान्यवरांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले

## शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी

**जालना-** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी, पोलीस अधिकारी-कर्मचारी, बँकेच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी-कर्मचारी यांच्या व्यतिरिक्त मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन ४१७१ व ४२४३/२०१४ च्या आदेशास अधीन राहुन जिल्ह्यातील महानगरपालिका कार्यक्षेत्रातील परवानाधारक व्यक्तींनी परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास बंदी घालण्यात आली आहे. असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत. महाराष्ट्र राज्य निवडणुक आयोगाच्या निर्देशानुसार महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक-२०२५कार्यक्रम घोषित करण्यात आला असुन महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचार संहिता दि. १५ डिसेंबर २०२५ पासुन लागु झाली आहे, सदर निवडणुका निर्भय आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी जालना जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन निवडणुक घोषित झाल्यापासुन निवडणुक निकाल घोषित होईपर्यत, शस्त्र परवानाधारक यांना परवाना दिलेले शस्त्रास्त्रे वाहुन नेण्यावर व बाळगण्यास निर्बंध लागू करणे आवश्यक आहे. जिल्हयातील शस्त्र परवानाधारकास नोटीस देवून त्यांचे म्हणणे ऐकुन घेणे सद्यस्थितीत शक्य नसल्याने एकतर्फी आदेश काढण्यात आले आहेत. संबंधित शस्त्र परवानाधारकांनी आपले शस्त्र नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये जमा करावेत. निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर एक आठवड्याचे आत संबधितांचे शस्त्र परत करण्यात यावे. सदर आदेश जालना जिल्ह्यासाठी निर्गमित झाल्याच्या तारखेपासुन दि. १६ जानेवारी २०२६ पर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## सत्यशोधक विद्यालय येथे समाजशास्त्र विषयाचे मार्गदर्शन संपन्न

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** मानव विकास व पुर्ननिम ाण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित, सत्यशोधक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय गोषेगाव जिल्हा जालना येथे आज दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी समाजशास्त्र विषयाचे मार्गदर्शक श्री.सुभाष मोहिते हे होते. त्यांनी सांगितले की मी समाजशास्त्र विषया मध्ये मी नेट, सेट झालो जे तुम्ही ठरवले तर ते यश तुम्ही संपादित करू शकतास त्यांनी ह्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्ण सिलॅबस चे वर्गीकरण विद्यार्थ्यांना प्रायम री व माध्यमिक ला जे शिक्षण तुम्ही घेता त्याचा मन लाऊन अभ्यास करा त्याचे दररोज सराव करत जा ज्या मुळे तुम्हाला, ते लक्षात राहील ते पण कायमचे असे त्यांनी सांगितले व पुढे त्यांनी करिअरच्या विविध संधी



कशा असतात मी पण ह्याच शाळेचा विद्यार्थी होतो व याचा मला सार्थ अभिमान आहे असे त्यांनी मत मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण श्री. फुके यांनी केले,त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की आपण समाजाचे काही देणे लागतो त्या मुळे आपण तीन गरजू लोकांची मदत करायची व त्यांना सांगायचं की त्यांनी पुढील तीन गरजू लोकांची मदत करायची. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीमती दांडगे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.श्री.पांढरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. चंद्रे यांनी मानले. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष तथा प्राचार्य श्री.सुनीलजी वाकेकर तसेच संस्थेच्या सचिव श्रीमती जयश्रीताई बनकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ फेब्रुवारी २६ च्या प्रथम आठवड्यात

# विद्यार्थ्यांना मराठीतील नाव पडताळणीचे आवाहन




**नाशिक । प्रतिनिधी -** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षांत समारंभ येत्या फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी येत्या २८ डिसेंबर २०२५ पर्यंत विद्यापीठाकडे नोंदवलेल्या आपल्या मराठी नावाची पडताळणी करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

डिसेंबर २०२४. फेब्रुवारी / म ार्च २०२५ आणि मे / जून २०२५ या परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर म राठी भाषेतील (देवनागरी लिपी) त्यांचे नाव अचूक यावे याकरीता नावाची पडताळणी व दुरुस्तीकरीता विशेष सुविधा विद्यापीठामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. प्रवेश अर्ज भरतेवेळी काही विद्यार्थी आपल्या नावाची मराठीतील नोंद अचूक करीत नाहीत, असे विद्यापीठाच्या निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या नियोजनानुसार संबंधित विद्यार्थ्यांच्या पदवी प्रमाणपत्रावर त्यांच्या मराठीतील नावातील संभाव्य चुका टाळण्यासाठी नाव पडताळणी व दुरुस्तीचे अभियान विद्यापीठामार्फत राबविण्यात येत आहे. उत्तीर्ण झालेल्या पदवीधरांना दीक्षांत सोहळ्यात देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रासाठी आपले मराठी नाव पडताळणी आणि दुरुस्तीची सुविधा विद्यापीठाच्या https://31convocation.ycmou.ac.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळास भेट देवून आपले मराठी नाव तपासून त्यात काही दुरुस्ती असल्यास ती येत्या दिनांक २८ डिसेंबर २०२५ पर्यंत करावी. तसेच विद्यार्थ्यांनी आपले म राठी नाव दुरुस्ती न केल्यास भविष्यात त्यांच्या प्रमाणपत्रावरील मराठीतील नाव दुरुस्तीसाठी विद्यापीठामार्फत शुल्क आकारण्यात येईल. त्यामुळे संबंधित सर्व विद्यार्थांनी दिलेल्या मुदतीत विद्यापीठ संकेतस्थळास भेट देऊन आपल्या पदवी प्रमाणपत्रावरील मराठी नावाचा तपशील अचूक असल्याची खात्री करावी व आवश्यक असल्यास त्यात योग्य ती दुरुस्ती करावी. या संदर्भात काही अडचण असल्यास (०२५३) २२३०७३४ या दूरध्वनी क्रमांकावर व sfcycmou.ac.in या ईमेलवर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे आणि परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी केले आहे.



# मंठा येथे बंजारा समाज बांधवांच्या वतीने आमदार बबनराव लोणीकर यांचा नागरी सत्कार

## मंठा येथे एकदंत हॉस्पिटल व पंचकर्म केंद्रचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते उदघाटन

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा येथे बंजारा समाज बांधवांच्या वतीने आमदार बबनराव लोणीकर यांचा नागरी सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल व विशेषतः बंजारा समाजाला अनुसूचित जमाती (एस.टी.) प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या महत्त्वाच्या मागणीसाठी विधिमंडळात आवाज उठवल्याबद्दल समाज बांधवांनी त्यांचा सत्कार केला.

यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण देण्यासंदर्भात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या उत्तरात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत, लवकरच या विषयावर समिती गठीत करण्यात येईल व समितीच्या अहवालानुसार सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सभागृहात स्पष्ट केले.

आमदार लोणीकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, बंजारा समाजाने ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनशैलीतून अनेक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. शिक्षण, रोजगार व सामाजिक विकासाच्या दृष्टीने समाजाला न्याय मिळणे गरजेचे असून, त्यासाठी आपण सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

सत्काराला उत्तर देताना आमदार लोणीकर यांनी बंजारा समाजाच्या प्रेमाबद्दल व विश्वासाबद्दल आभार मानले. समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी मी सदैव लढत राहीन. हा लढा केवळ राजकीय नसून सामाजिक न्यायाचा आहे, असे ते म्हणाले.

या कार्यक्रमास बंजारा समाजाचे पदाधिकारी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक, तसेच स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बंजारा समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून आरक्षण मिळावे, ही मागणी लवकरच मार्गी लागेल, असा विश्वास यावेळी समाज बांधवांनी व्यक्त केला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष नितीन राठोड, गणेशराव खवणे, संदीप भैय्या गोरे, पंजाब बोराडे,राजेश मोरे,प्रसाद गडदे ,कैलास बोराडे, नगराध्यक्ष वैजनाथ बोराडे,नागेश घारे,मोहन आढे, शिवाजी जाधव,मालदार,कैलास चव्हाण, अर्जुन राठोड,शुभम आढे, अविनाश राठोड,दिलीप चव्हाण, दिलीप राठोड,पंकज राठोड,चेतन जाधव,राहुल राठोड,अशोक राठोड,श्री चव्हाण,गोकुळ राठोड, मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बंजारा समाज व धनगर समाजातील प्रमुख पदाधिकारी गोरसेना, शिक्षक कर्मचारी संघटना, डॉक्टर असोसिएशन यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

**मंठा येथे एकदंत हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र चे आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते उद्घाटन**

मंठा येथे एकदंत हॉस्पिटल व पंचकर्म केंद्राचे उद्घाटन आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या उद्घाटनप्रसंगी बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, डॉ. अभिजीत अवचार व डॉ. इंद्रायणी अवचार यांच्या हातून समाजासाठी उत्तम व निस्वार्थ रुग्णसेवा घडो, अशा शब्दांत त्यांनी शुभेच्छा दिल्या.

या वेळी आमदार लोणीकर यांनी ग्रामीण व निमशहरी भागात दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे ही काळाची गरज असल्याचे नमूद केले. आधुनिक उपचारपद्धतींसह आयुर्वेदिक पंचकर्म उपचारांची सांगड घालणारे हे हॉस्पिटल परिसरातील नागरिकांसाठी मोठी सोय ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. एकदंत हॉस्पिटल व पंचकर्म केंद्रामुळे मंठा व आजूबाजूच्या भागातील रुग्णांना शहरात जाण्याची गरज न पडता स्थानिक पातळीवरच उत्तम उपचार मिळणार आहेत.



यावेळी डॉ. अभिजीत अवचार व डॉ. इंद्रायणी अवचार यांनी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती दिली. आधुनिक वैद्यकीय उपचारांसोबतच आयुर्वेदिक पंचकर्म, रोगप्रतिबंधक उपचार, तसेच आरोग्यविषयक सल्ला या सेवा येथे उपलब्ध राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा मानून कार्य करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उद्घाटन सोहळ्यास अंकुशराव बोराडे गोपाळराव बोराडे अंकुशराव अवचार बाबुराव शहाणे संदीप भैया गोरे गणेशराव खवणे राजेश मोरे पंजाबराव बोराडे वैजनाथ बोराडे नागेशराव घारे अजय अवचार सुरेश सरोदे डॉ. दत्तात्रय काकडे विठ्ठलराव काळे बाबासाहेब देशमुख किसनराव चव्हाण उद्धवराव भोसले बंडू नाना खरात हरिभाऊ चव्हाण महादेवराव लोंढे वसंतराव बागल योगेश नाईक जनार्दन काकडे विठ्ठलराव कदम दिगंबर आवचार सुभाष बागल विष्णुपंत चव्हाण विष्णुपंत वांजोळकर प्रभाकरराव देशमुख शिवाजीराव आवचार यादवराव अवचार महादेवाच्या रंगनाथ आवचार राजूभाऊ आवचार दिगंबरा अवचार ओंकार अवचार दत्तात्रय अवचार सुरेश अवचार यांच्यासह शहरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञ, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्वांनी सहकार्य केले. एकदंत हॉस्पिटल व पंचकर्म केंद्राच्या माध्यमातून परिसरातील नागरिकांना उत्तम, परवडणारी व विश्वासार्ह आरोग्यसेवा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# रावसाहेब दानवे यांच्याकडून भाजपचे नवनियुक्त राष्ट्रीय कार्याध्यक्ष नितीन नबीन यांचे अभिनंदन

**जालना । प्रतिनिधी** - भारतीय जनता पक्षाचे नवनियुक्त राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. श्री. नितीनजी नबीन यांची माजी केंद्रीय मंत्री श्री.रावसाहेब पाटील दानवे यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कार्यालयात सदिच्छा भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

माननीय नितीनजी यांचा पक्षकार्याचा दांडगा अनुभव, संघटनकौशल्य आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची कार्यपद्धती लक्षात घेता, त्यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पक्ष आगामी काळात यशाची नवी शिखरे गाठेल, असा आम्हाला दृढ विश्वास आहे. भाजपचा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असताना पासून नितीनजींशी माझी एक कार्यकर्ता म्हणून जुनी ओळख आहे. माझ्यासारखेच त्यांनीही एक सामान्य कार्यकर्ता म्हणून संघटनेत काम करत स्वतः ची ओळख निर्माण केली आहे असे हि त्यांनी सांगितले आहे.



# स्टेअर्स युथ गेम्स कराटे जिल्हा निवड चाचणी

**जालना । प्रतिनिधी -** स्टेअर्स युथ गेम्स फेडरेशन तर्फे जानेवारी महिन्यात मुंबई विरार येथे होत असलेल्या स्टेट कराटे चॅम्पियनशिप साठी जालना जिल्हा निवड चाचणी चे आयोजन करण्यात आलेले आहे, त्याकरिता स्टेअर्स युथ गेम्स फेडरेशन तर्फे जालनाचे कराटे चीफ कॉर्डिनेटर म्हणून सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील सर्व कराटे खेळाडूंना आवाहन करण्यात येते की जिल्हा निवड चाचणी करिता त्यांनी दिनांक २० डिसेंबर २०२५ शनिवार रोजी संध्याकाळी ०५:००ा वाजे पर्यंत सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांच्याशी ९४२३७३०७२७ संपर्क साधावा व जास्तीत जास्त कराटे खेळाडूंनी सहभाग नोंदवावा.

# एमएस जैन इंग्लिश शाळा व्यवस्थापन विरोधात वॉरंट जारी

## हायकोर्टचा दणका; संस्था अध्यक्ष व मुख्याध्यापिकेवर आवळला शिकंजा

**जालना । प्रतिनिधी -** न्यायालयीन आदेशांचे सातत्याने उल्लंघन केल्याप्रकरणी बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जालना येथील श्री एम. एस. जैन इंग्लिश स्कूलच्या व्यवस्थापन विरोधात कठोर भूमिका घेतली आहे. १५ डिसेंबर २०२५ रोजीच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्यायमूर्ती वैशाली पाटील-जाधव यांच्या खंडपीठाने संस्थेचे अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा आणि मुख्याध्यापिका सीमा सुहास कुलकर्णी यांच्याविरोधात जामिनयोग्य वॉरंट जारी करण्याचे आदेश दिले. न्यायालयीन आदेशांची अवहेलना कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा न्यायालयाने दिला आहे.

हे प्रकरण न्यायालयाचा अवमान याचिकेशी संबंधित असून, शाळा व्यवस्थापनावर वारंवार न्यायालयीन आदेशांचे उल्लंघन, शिक्षकांची बेकायदेशीर सेवा समाप्ती, थकीत वेतन न करणे तसेच मनमानी पद्धतीने वेतन कपात केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हा वाद सन २०२३ मध्ये शिक्षकांकडून दाखल करण्यात आलेल्या मूळ रिट याचिकेतून उद्भवला आहे. याचिकेत, ठरवून दिलेल्या निकषांपेक्षा अत्यल्प वेतन, अनियमित वेतन वितरण आणि सातत्याने होणाऱ्या शोषणाबाबत तक्रार करण्यात आली होती. आज पर्यंत मूळ रिट याचिकेमध्ये तीन आणि वेगवेगळ्या अवमान याचिकेत तीन असे सहा महत्त्वपूर्ण आदेश बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने शिक्षकांच्या बाजूने दिले आहे. दरम्यान शाळेकडून काही शिक्षकांवर खोटे गुन्हे दाखल करून त्यांना याचिकेतून माघार घेण्यास दबाव टाकण्यात येत आहे. हे केवळ कायद्याचा गैरवापर नाही तर मानवी प्रतिष्ठेवर थेट हल्ला आहे.

**शिक्षण विभागाच्या हरकती**

मराठवाडा शिक्षक संघ, संघटनेच्या प्रयत्नातून जालना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागानेही शाळा व्यवस्थापनाला वेळोवेळी तब्बल चौदा इशारापत्रे व नोटीसा पाठवली आहेत. थकीत वेतन, मनमानी कपात, हजेरी नोंदवही सादर न करणे तसेच इतर अनियमित बाबींवर विभागाने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. हे वेतन अधिनियमाचे उल्लंघन असल्याचे विभागाने नमूद केले आहे.

प्रभावित शिक्षकांनी दीर्घकाळापासून मानसिक, आर्थिक व प्रशासकीय त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले आहे. हा प्रकार केवळ एका शाळेपुरता मर्यादित न राहता खासगी शैक्षणिक संस्थांमधील व्यवस्थापनाची जबाबदारी, शिक्षकांचे हक्क आणि न्यायालयीन आदेशांचे पालन या व्यापक मुद्द्यांकडे लक्ष वेधणारा ठरत आहे. आगामी सुनावणीदरम्यान शाळा व्यवस्थापनाची वैयक्तिक उपस्थिती व आदेशांचे पालन होते की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.